# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

### उपनगरीय रुग्णालयांच्या आस्थापनेवर विविध संवर्गातील पदे कंत्राटी तत्वावरील भरती

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारित असलेल्या १६ उपनगरीय रुग्णालयांच्या आस्थापनेवरील खाली नमूद करण्यात आलेली विविध संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर ०२ वर्षाच्या कालावधीकरीता (प्रत्येक १७९ दिवसानंतर खंड देऊन) ठोक मानधनावर भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज शुल्क रु. ७१०/- + १८ % जीएसटी १२८/- = रु. ८३८/- इतके भरुन अर्ज वितरीत करण्यात येतील .

सदर अर्जाची विक्री व स्विकृती दि. २८.०१.२०२५ ते दि.१२.०२.२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) संध्या. ४.०० वाजेपर्यंत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा)यांचे कार्यालय, ७ वा मजला, बांद्रा भाभा रुग्णालय इमारत, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५० येथे करण्यात येणार आहेत.

| अनु.क्र | पदनाम | | पदसंख्या | कंत्राटी मासिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | **सहाय्यक वैदयकीय अधिकारी** (Assistant Medical Officer) | | 83 | 90000/- |
| 2 | **पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी** (Post Graduate Medical Officer ) | Anesthesiology | 3 | 100000/- |
| | | General Medicine | 7 | |
| | | General Surgery | 8 | |
| | | Microbiology | 2 | |
| | | Obstetrics and Gynecology | 12 | |
| | | Orthopedics | 1 | |
| | | Paediatrics | 8 | |
| | | Pathology | 2 | |
| | | **Total** | **43** | |
| 3 | **वैद्यकीय अधिकारी** Medical Officer **(Radiology)** | | 5 | 100000/- |
| 4 | **भौतिकोपचार तज्ञ** Physiotherapist | | 6 | 40000/- |
| | **Grand Total** | | **137** | |

**वयोमर्यादा -**

वैदयकीय अधिकारी / सहाय्यक वैदयकीय अधिकारी या पदांवर कंत्राटी तत्वावर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी अर्हताधारक तसेच अनुभवी उमेदवार प्राप्त होत नसल्याने सदर वैद्यकीय संवर्गाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा ६२ वर्षे इतकी आहे.

१. वैदयकीय संवर्गासाठी - उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६२ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

२. भौतिकोपचार तज्ञ पदाकरीता - उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**पदांच्या अर्हता -**

1. **<u>सहाय्यक वैदयकीय अधिकारी</u>**

   १. उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची "एम.बी.बी.एस. " पदवी असणे आवश्यक आहे.

   २. उमेदवार महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

   ३. एच. एम. आय. एस.(HMIS) संगणकीय प्रणालीमध्ये (जेथे उपलब्ध आहे तेथे) रुग्णांची माहिती स्वत: भरावी लागेल त्यादृष्टीने आवश्यक ते संगणक वापराचे कौशल्य असावे.

   ४. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**2. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (PGMO)**

१. उमेदवाराकडे वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )

२. उमेदवार महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

३. उमेदवारास पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा.

४. बंधपत्र (**Bond Completion Certificate**) ज्या उमेदवारांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले ) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

५. उमेदवार १०० गुणांचा मराठी विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असावा.

६. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे, सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम. एस.सी. आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

**3. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी P.G.M.O.(microbiology)**

१. उपरोक्त २ प्रमाणे तथापि संविधिक विद्यापीठाची microbiology विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे.

२. उमेदवाराकडे वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची सुक्ष्मजीवशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / DNB** )

**4. वैद्यकीय अधिकारी M O(Radiology) –**

१. उमेदवाराकडे वैधानिक विद्यापीठाची "एम.बी.बी.एस." पदवी आणि संविधिक विद्यापीठाची क्ष-किरणशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / DNB**)

२.उमेदवार महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

३. एच. एम. आय. एस.(HMIS) संगणकीय प्रणालीमध्ये (जेथे उपलब्ध आहे तेथे) रुग्णांची माहिती स्वत: भरावी लागेल त्यादृष्टीने आवश्यक ते संगणक वापराचे कौशल्य असावे.

४.मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**5. भौतिकोपचार तज्ञ –**

१.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा B.Sc.(PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचार) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) पदवीधारक असावा.

२. उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा.

३.उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४. उमेदवार “डी.ओ.ई.ए.सी.सी.सोसायटीचे’’“सी.सी.सी.’’ किंवा “ओ स्तर ’’ किंवा “ए स्तर’’ किंवा “बी स्तर’’ किंवा “सी स्तर’’ स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

**कर्तव्ये व जबाबदारी:-**

कंत्राटी तत्वावरील 'सहाय्यक वैदयकीय अधिकारी' या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर निवडून दिलेल्या उमेदवारांना 'सहाय्यक वैदयकीय अधिकारी' व 'वैदयकीय अधिकारी' या पदांसाठीची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावी लागेल. त्यातील काही ठळक 'कर्तव्ये व जबाबदारी' पुढीलप्रमाणे-

१. सदर उमेदवारांना उपनगरीय रुग्णालयांच्या अपघात विभाग/ तात्काळ सेवा विभागात चक्रांकित पध्दतीने तिन्ही सत्रांत रविवार / सार्वजनिक सुट्टी / ओ.पी.डी. सुट्टी मध्ये काम करावे लागेल व नियमानुसार प्रशासनाने / रुग्णालय प्रमुखांनी मंजुर केलेल्या डयूटी लिस्ट प्रमाणे साप्ताहिक सुट्टी आणि पूरक रजा मिळेल.

२. तसेच प्रशासनाने / रुग्णालय प्रमुखांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैदयकीय अधिकारी / वैदयकीय अधिकारी यांच्या आदेशाने आवश्यकतेनुसार रुग्णालयातील इतर विभाग, बाहयरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग आणि अतिदक्षता विभाग येथे काम करावे लागेल.

३. सदर डॉक्टरांना रुग्णालयात काम करताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्त्वे व कार्यप्रणाली चे पालन करावे लागेल, तसेच संबंधित रुग्णसेवेसाठीची न्याय वैद्यकीय (Medico Legal) जबाबदारी घ्यावी लागेल.

४. सदर उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक, महापालिका कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी सौजन्याने वागावे.

**सर्वसाधारण अटी -**

१. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर नेमणूका करण्यात येतील. तथापि नियुक्ती केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेतील नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

२. जाहिरातींमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे.

३. उपरोक्त संवर्गात नियमित तत्त्वावर कर्मचारी प्राप्त झाल्यास अथवा पदे कमी झाल्यास सदर कंत्राटी उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.

४. अर्ज स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेले असावेत. विहित नमुन्यामध्ये न भरलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

६. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

७. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

८. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार केवळ उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी बोलाविण्यात येईल. त्यांची यादी व पडताळणीचा दिनांक प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांचे कार्यालय, ७ वा मजला, बांद्रा भाभा रुग्णालय इमारत, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५० येथे दि.१७.०२.२०२५ रोजी सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

९. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे / व्यावसायिक अर्हता / संबंधित गुणपत्रिका / अनुभवाचे प्रमाणपत्र/ नेमणूक पत्र यांच्या मूळप्रती व स्वयंसाक्षांकित छायांकीत प्रतींसह पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

१०. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

११. उमेदवारांना अर्ज सादर करण्याच्या तसेच पडताळणीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२. निवड झालेल्या उमेदवारांने संबंधित पदावर नियुक्ती करण्यांपूर्वी जाहिरातीत नमूद केल्यानुसार १००/- रुपयांच्या बाँड पेपर वर प्रतिज्ञापत्र दयावे लागेल.

१३. सदर उमेदवारांसाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.

१४. कंत्राटी उमेदवारांची रुग्णालयांच्या आवश्यकतेनुसार १६ उपनगरीय रुग्णालयात नेमणूक / बदली केली जाईल.

१५. कंत्राट कालावधी / सेवा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर वा इतर पदांवर नियुक्ती वा निवडीकरीता उमेदवारांना कोणतेही प्राधान्य देण्यात येणार नाही.

**<u>विशेष सूचना:-</u>**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले / टपालाव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज लिहीणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

3. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

4. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यांवर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

5. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

सही/-

**प्रमुख वैदयकीय अधिक्षक व खाते प्रमुख**

**(माध्यमिक आरोग्य सेवा) (प्रभारी)**